# ढगांचे अधिक्रमण !

## आता प्रतीक्षा बुधाच्या अशाच चमत्काराची

खास प्रतिनिधी

ठाणे

या शतकातील दुसरा आणि आता शतकानंतरच दृष्टीस पडेल असा शुक्र अधिक्रमणाचा खगोलीय चमत्कार पाहण्याची मुंबई-ठाणेकरांची संधी पावसाळी ढगांनी हिरावून नेली. शुक्राचे रविबिंबावरील अधिक्रमण पाहण्यासाठी पहाटेपासूनच उगवतीकडे दुर्बिणी रोखून बसलेल्या खगोलीप्रेमींची यामुळे निराशा झाली.

आता पुन्हा १०५ वर्षांनी शुक्राचे अधिक्रमण होणार आहे. ते पाहण्याची अपूर्व संधी या जन्मात आपण सर्वांनी गमावली असली तरी ९ मे २०१६ रोजी बुध ग्रहाचे अधिक्रमण पाहण्याची संधी आपणास मिळणार आहे. बुधाचे ते अधिक्रमण भारतातूनही दिसेल, अशी माहिती खगोल अभ्यासक दा. कृ. सोमण यांनी दिली.

केरळमध्ये मान्सूनचे आगमन झाल्याची वर्दी घेऊन आलेल्या



वाराणसीमधून टिपलेले अधिक्रमण

ढगाळ वातावरणामुळे बुधवारी दिवसभर सूर्यदर्शन झाले नाही. त्यामुळे शुक्राचे सूर्यासमोरून होणारे अधिक्रमण खगोलप्रेमींना पाहता आले नाही. मुंबई-ठाण्यात अनेक ठिकाणी दुर्बिणीद्वारे हे दृश्य पाहण्याची सोय खगोलप्रेमी मंडळींनी केली होती. मात्र पावसाळी ढगांनी त्यांच्या साऱ्या योजनांवर पाणी फिरविले. त्यामुळे आता खगोलप्रेमींना ओढ लागली आहे ती भारतातून चार वर्षांनी दिसणारे बुधाचे अधिक्रमण, तसेच २६ डिसेंबर २०१९ रोजी होणारे कंकणाकृती सूर्यग्रहण पाहण्याची.

**Loksatta, Pune, June 7, 2012. Pp.1**